**नि.दिवाणी दावा क्रं.५९/२००९**

**नि. क्रं.१३२**

**:: वादी पक्षातर्फे सा. क्रं.०५ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो/करते की,**

**माझे नांव** : सचिन नागेश नरवणे

**वय** : ४२ **धंदा** : ग्रामसेवक,

ग्रामपंचायत गुरधाळ ता. देवणी जि. लातूर.

**:: वादी पक्षातर्फे सरतपासणी विधीज्ञ श्री. व्ही.एन. संकाये यांचेमार्फत शपथेवर सुरू ::**

गुरधाळ येथील ग्रामपंचायत ही वर्ष १९६२ मध्ये स्थापन झाली. पाच सहा वर्षापूर्वी ग्रामपंचायतमध्ये वारसा प्रमाणपत्र देत होते. आता मला दि.२६/०९/२००९ रोजी दिलेले वारसाचे प्रमाणपत्र दाखविले. त्यावर ग्रामसेवकाची सही आणि ग्रामपंचायतचा शिक्का आहे. त्यावर सरपंच, उपसरपंच आणि पोलीस पाटील यांच्या सह्या आहेत. शकुंतला तुकाराम गटट्े ही पांडुरंग नागोराव वलसेची वारस असल्याबाबत सदर प्रमाणपत्र आहे. (सदर साक्षीदाराने सदर प्रमाणपत्र जारी केलेले नाही किंवा त्यावर त्याची सही नाही त्यामुळे तो त्याचा प्रत्यक्ष साक्षीदार नाही. सबब त्याच्या साक्षीद्वारे सदर प्रमाणपत्र सिध्द झालेले नाही. त्यामुळे त्यास फक्त ओळख म्हणून **नि.१३३** देण्यात येते.) सदर प्रमाणपत्र हे तत्कालीन ग्रामसेवकाने दिलेले आहे.

सरतपास पूर्ण.

**:: प्रतिवादी क्र.१ ते ३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. डी.टी. पाटील यांच्यामार्फत ::**

०२. मला साक्षीसमक्ष मिळाला होता. मी तो वाचला होता. मी न्यायालयामध्ये येईपर्यंत मला कोणत्या मुद्दयावर साक्ष द्यायची आहे हे मला

माहीत नव्हते. मला वारसा प्रमाणपत्राबाबत साक्ष द्यायचे आहे असे वकिलाने सांगितले. वारस प्रमाणपत्रावर पोलीस पाटलाची सही घेण्याची पध्दत किंवा कायदेशीर तरतूद आहे किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. ग्रामपंचायत कार्यालयाला वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नमूद वारसाचे प्रमाणपत्र खोटे आणि बोगस आहे. हे म्हणणे खरे आहे की, वारसाचे प्रकरण देण्यासाठी सर्वप्रथम त्यासाठी अर्ज घेतला जातो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

:: **प्रतिवादी क्र.४ ते १२ आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी प्रकरण चालविण्यास आणि उलटतपास घेण्यास कसूर केला. सबब उलटतपास नाही.** ::

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत　　　　　　सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )　　　　　　( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.　　दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.२३/०२/२०२६.